साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–संजय रामदास कोल्हे,
वय ४५ वर्ष, व्यवसाय– शेती,
राह.डब्लु.सी.एल.कॉलोनी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास यापुर्वीच **निशाणी क्र.१०** देण्यात आला. त्यानंतर मी घटनास्थळ बार डब्लु.सी.एल, उमरेड येथे गेलो होतो व पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, मला वाचुन दाखविला. सदर पंचनामा हा अपघाताच्या बाबतचा होता. घटनास्थळावरून पोलिसांनी माझ्यासमक्ष चप्पल, मोबाईल इ. जप्त केले होते याव्यतिरिक्त काय जप्त केले होते हे मला माहिती नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास यापुर्वीच **निशानि क्र.११** देण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो काढले होते.

२. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये एक कारचा फोटो आहे व एक घटनास्थळावरिल फोटो आहे त्यामध्ये माझा फोटो आहे यापुर्वीच अनुक्रमे **आर्टीकल अ** आणि **ब** देण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी माझ्यासमक्ष कारचा पंचनामा तयार केला होता. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास यापुर्वीच **निशानि क्र.१२** देण्यात आले.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.एस.व्ही.काळे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर हजर राहण्याकामी मला पोलिसांनी अगोदर सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिसांच्या सांगण्यावरून घटनास्थळ पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा वाचुन दाखविला नव्हता. मी घटनास्थळाच्या चतुर्सिमा सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करतेवेळेस घटनास्थळावर किती लोकं होते हे मला माहिती नाही. हे

म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१२ वर मी वाचुन न पाहता सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा पोलिसांनी पुर्वीच तयार करून ठेवला होता व पोलिसांनी फक्त माझ्या त्यावर सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ व ब फोटो काढण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही व मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१६.०४.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड